REVIEWS OF LITERATURE
ISSN: 2347-2723
IMPACT FACTOR : 3.3754(UIF)
VOLUME - 5 | ISSUE - 4 | NOVEMBER - 2017

# भारतातील काळा पैसा : एक आव्हाण




*डॉ. खोंड सुरेश वसंतराव*
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण, ता. कळंब, जि. उस्मानाबाद.**

## ➢ प्रस्तावणा:-

अलिकडे काळ्या पैशाबाबत सर्वत्र चर्चा चालू असल्याचे आपणास पहावयास मिळत आहे. कारण काळा पैसा हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील फार मोठा अडसर आहे हि बाब आता सर्वसामान्य माणसांच्याही लक्षात आलेली आहे. भारतात अलिकडील काळात उघडकीस येत असलेल्या टू-जी, राष्ट्रकुल यासारख्या मोठ-मोठ्या घोटाळ्यांमुळे या चर्चेला पुष्टी मिळत आहे. मात्र हा काळा पैसा म्हणजे काय असतो? याबाबत मात्र सर्वसामान्यांमध्ये संभ्रमाची अवस्था असलेली पहावयास मिळते. काळा पैसा ही भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने एक गंभीर समस्या बनत चाललेली आहे. त्यामुळे काळ्या पैशाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. म्हणून भारतातील काळ्या पैशाबाबत विश्लेशन करणे आवश्यक आहे.

## ➢ संशोधनाची उद्दिष्ट्ये:-

१) काळ्या पैशाचा अर्थ अभ्यासने.
२) भारताचा विदेशातील काळ्या पैशाचा आढावा घेणे.
३) भारतातील काळ्या पैशाचा अंदाज घेणे.
४) काळया पैशाचे व्यवहार रोखण्यासाठी केंद्र सरकारने केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

## ➢ संशोधन पध्दती:-

प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीयक साधसामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. ज्यामध्ये भारतातील वाहतूक व्यवस्था या संदर्भातील वेगवेगळी पुस्तके, वर्तमानपत्रातील लेख, मासिके, अहवाल, सर्वेक्षणे, वेबसाईटवर उपलब्द असलेली माहिती यांचा आधार घेण्यात आलेला आहे.

## ➢ काळा पैसा म्हणजे काय?

काळा पैसा म्हणजे अर्थव्यवस्थेतील असा पैसा की, जो अवैध किंवा बेकायदेशीर व्यवहारातुन मिळवलेला असतो. ज्यावर कोणत्याही प्रकारचा कर भरला जात नाही. तसेच राष्ट्रीय उत्पन्नात या पैशाचा समावेश केला जात नाही. असा हा पैसा अर्थव्यवस्थेतील अवैध क्षेत्रात निर्माण होत असतो. अर्थव्यवस्थेतील वैध कायदेशीर पैशाबरोबरच अर्थव्यवस्थेत असा काळा पैसाही अस्तित्वात असतो. हा काळा पैसा प्रामुख्याने अनुत्पादक कार्यासाठीच वापरला जातो. हा काळा पैसा अर्थव्यवस्थेत नेमका किती आहे यासंबंधी मात्र निश्चीत आकडा सांगता येत नाही. कारण हा काळा पैसा अवैध मार्गाने मिळवलेला असल्यामुळे या पैशाची सरकार दरबारी नोंद नसते. त्यामुळे या पैशाची मोजदाद करता येत नाही.

भारतातील कररचनेतील दोष जसे की, करांचे वाढते दर, परवाना पध्दतीतील दोष यामुळे भारतात उत्पन्न लपविने लाच देणे-घेणे, संपत्ती अवमुल्यन (मुद्रांक शूल्क चोरी) या कारणांमुळे बेकायदेशीर व्यवहार वाढत आहेत. त्यातून भारतात दिवसेंदिवस काळ्या पैशाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. एका अंदाजानुसार भारतातील काळ्या पैशाचे प्रमाण हे स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या (GDP) च्या जवळपास २०% एवढे आहे. यानुसार भारतात दरवर्षी जवळपास ४ लाख कोटी रुपये ($८० बिलीयन) एवढा काळा पैसा निर्माण होतो. जो देशाच्या अर्थव्यवस्थेत अवैध क्षेत्रात निर्माण होतो. आणि या पैशाचा वापर हा प्रामुख्याने अनुत्पादक कार्यासाठी होत असतो. अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टिने हा काळा पैसा उपयोगात येत नसतो. एवढेच नाही तर हा काळा पैसा प्रचलीत अर्थव्यवस्थेच्या विकासात अडथळे निर्माण करतो.

## ➢ भारतीय अर्थव्यवस्था आणि काळा पैसा:-

जगातल्या १७८ भ्रष्ट देशाच्या यादीत भारताचा क्रमांक ९५ वा लागतो. कंट्रोलर ॲन्ड ऑडिटर जनरल ऑफ इंडिया यांनी हा भ्रष्टाचार वाहातूक व्यवस्था स्थावर मालमत्तेचे व्यवहार आणि अन्य सार्वजनिक व्यवस्थेत होतो असा निष्कर्ष काढला आहे. काळा पैसा हे देशातील भ्रष्टाचाराचे एक स्वरुप देशातील भ्रष्टाचाराची वेगळी उदाहरणे द्यावयाची अवश्यकता सध्या तरी वाटत नाही. महाराष्ट्र म्हटले म्हणजे, आदर्श घोटाळा डोळ्यासमोर येतो. गोवा म्हटले तर अमली पदार्थाचा व्यापार दिसायला लागतो. दिल्ली म्हटले तर २-जी स्प्रेक्ट्रम आणि राष्ट्रकूल स्पर्धा दिसायला लागतात. बिहार म्हटले तर चारा घोटाळा आणि कर्णाटक म्हटले की भुखंड घोटाळा दिसायला लागतो. हि अलिकडच्या काळातील भ्रष्टाचारी उदाहरणे आहेत. राजू चेलिया गटाच्या अहवालानूसार भारतात प्रत्येक रुपयाच्या व्यवहारातील एक पंचमांश भाग हा काळ्या व्यवहारात होतो. १९८३-८४ या एकाच वर्षात तब्बल ३६ कोटी किंवा तेव्हाच्या ढोबळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या २१ टक्के भाग हा काळा पैसा होता असे या गटाने म्हटल्याचे दिसून येते. या गटाच्या मतानूसार या काळ्या पैशात परकीय व्यापारासाठी लाचखोरी, तस्करी आणि परकीय चलन व्यवहारासह अमली पदार्थ आणि इतर गुन्हेगारी व्यवहारातून जन्मणाऱ्या काळ्या पैशाची मोजदाद करता आली नाही.

## ➢ भारतातील काळ्या पैशाचा अंदाज:-

देशात तब्बल तीस हजार रुपये किंमतीची बेहिशोबी मालमत्ता असल्याची माहिती प्रप्ती कर विभागाने दिली. २००९ पासून केलेल्या विविध कारवायादरम्यान या बेहिशोबी मालमत्तेची माहिती मिळाली. एप्रिल ते ऑक्टोबर २००९ या काळात तीनशे कोटी रुपयांचा काळा पैसा अवैद्य धन म्हणून जप्त केले आहे. देशात एकिकडे काळ्या धनावर तोडगा काढण्यासाठी सर्व स्तरावरुन प्रयत्न केले जातात. २००९ पासुन प्रप्ती कर विभागाने २१९० छापे टाकले आहेत, आणि २२९ कोटी ६३ लाख रुपये मुल्य असलेला काळा पैसा अवैद्य धन म्हणून जप्त केले. यापैकी १७९ कोटी ५९ लाख रुपये रोख स्वरुपात १५ कोटी ३६ लाख दागीण्याच्या स्वरुपात तर २४ कोटी ३६ लाख रुपये अवैद्य मालमत्तेच्या रुपात जप्त केले. २०१०-११ च्या आर्थिक वर्षात प्रप्तीकर विभागाने ४८५२ कारवायाद्वारे ७७४ कोटी १८ लाख रुपयाचा काळा पैसा जप्त केला होता. तर २००९ पसुन प्राप्ती कर विभागाने गैर प्रकारे उत्पन्नाच्या किंमती लावण्याच्या प्रकरणी तब्बल ६६ हजार ८५ कोटी रुपयाचा माल जप्त केला आहे. यापैकी ४२ हजार ८३८ कोटी रुपये माल हा चालू आर्थिक वर्षात पकडण्यात आला आहे. या कारवाईमुळे देशाला ३३ हजार ७८४ कोटी रुपयाचा महसूल मिळाला आहे. २००० ते २००९ या दहा वर्षाच्या काळात एकट्या भारतातून सहा लाख कोटी रुपयाचे काळे धन अवैद्य मार्गाने परदेशी बँकांच्या घशात घालन्यात आले आहे किंवा जात आहे. ग्लोबल फायनान्सीयल इंटिग्रेड या संस्थेने केलेल्या संशोधन अहवालातून हे वास्तव्य समोर आले. कर बुडविणाऱ्यांची संख्या भारतात मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसते. सरासरी भारतातून दरवर्षी ६३ हजार कोटींचे काळे धन जगभरातील विविध बँकांमध्ये जमा केले जाते. हे काळे धन दोन टप्प्यात पाठवले जाते. परदेशी फंडाच्या नावाखाली या पैशाची देवाणघेवान होते. आंरराष्ट्रीय व्यवसायाच्या पध्दतीने हे धन परदेशी बँकांमधील खात्यात ट्रान्सफर केली जाते. देशाचा कर बुडवूण अवैद्यरीत्या परदेशी बँकांमध्ये काळे धन जमा करणाऱ्या देशाच्या यादीत चीनचा पहिला क्रमांक लागतो. त्या खालोखाल मेक्सीको, रशीया, सवदी अरब, मलेशिया आणि अमेरीकेतूनही परदेशी बँकांमध्ये मोठ्या प्रमाणात पैसे ट्रान्फर होतात. भारतातून दरवर्षी ६३ हजार कोटींचे काळे धन दिसून येते.

## ➢ भारताच्या विदेशातील काळ्या पैशाचा अंदाज:-

परदेशात असलेला काळा पैसा हा मुख्यत्वे स्वित्झर्लंडमधील बँकामध्ये ठेवलेला असतो असा समज आहे. अधून मधून असा किती पैसा तिकडे आहे याचे काही वाइल्ड गेस प्रसारमाध्यमातून ऐकायला व वाचायला मिळतात. असा पैसा स्वित्झर्लंड मध्ये ठेवण्याचे कारण म्हणजे त्या बँका आपल्या ग्राहकांविषयी पूर्ण गुप्तता पाळतात. कुणाचा पैसा आहे आणि तो किती आहे याची माहिती कोणासही देत नाहीत. अशी गुप्तता पाळण्यास तेथील स्थानिक कायद्याचा पूर्ण पाठिंबा आहे. तोच स्विस बँकेचा यूएसपी आहे. अन्यथा मुद्दाम उठून स्विस बँकेत पैसा ठेवावा इतके जास्त व्याज काही स्विस बँका देत नाहीत. परंतू अलीकडे आंतरराष्ट्रीय दबावामुळे झुकून असा ठेवलेल्या काळ्या पैशाविषयी माहिती देण्याची आणि तो पैसा त्या देशांना परत करण्याची तयारी स्विस बँक सरकारने दाखवण्याची दिसून येते. स्विस बँक असोसिएशन या संघटनेने भारतातील लोकांनी १४५६ कोटी डॉलर्स इतका पैसा स्विस बँकेत ठेवल्याचे जाहिर केले आहे.

जागतिक बँकेच्या 'रेसिड्यूअल मेथड' नुसार व जागतिक फंडाचा व्यापारी अकडेवारी नूसार "दि ड्रायव्हर्स ॲन्ड डायनामिक्स ऑफ इलिसिट फायनान्सीयल फ्लोज फ्रॉम इंडिया-१९४८-२००८" या अहवालानुसार १९४८-२००८ या ६१ वर्षाच्या कालावधीत भारतातून एकुण २१३ अब्ज डॉलर एवढा काळा पैसा परदेशी पाठविण्यात आला त्यावरील व्याजाच्या परताव्याचा विचार करता या काळ्या पैशाची किंमत ४६२ अब्ज डॉलर एवढी होती. आजच्या विनीमय दराने विचार करता ४६२ अब्ज डॉलर म्हणजे सुमारे २१ लाख कोटी रुपये म्हणजे जवळपास ३ वार्षिकी अंदाजपत्रकाएवढा पैसा अथवा एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा ४० टक्के एवढा किंवा राजा या मंत्र्याने टू जी स्पेक्ट्रम मध्ये केलेल्या घेटाळ्याचा सुमारे १२ पट सरासरीने रोजचे भारताचे नुकसान होते. या नुकसानीला फक्त राजकारणी, भांडवलदार व लाचखोर अधिकारी जबाबदार आहेत. पी. साईनाथ या अर्थतज्ञाच्या मते भारत सरकारने जर योग्य नियंत्रण ठेवले असते तर डोंगराएवढा पैसा काळा झाला नसता

भारताने इतर देशांकडून घेतलेले कर्ज ह्या पैशाच्या निम्या रक्कमेतच फिटले असते व उरलेल्या रक्कमेत भारतातील गरीबी कमी करण्यास मोठी मदत झाली असती.

बँगलोरच्या इंडियन इस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे प्रध्यापक आर. वैद्यनाथन यांच्या म्हणण्यानुसार २००२ ते २००६ या काळात भारताच्या नागरीकांद्वारे १३६.५ अब्ज डॉलर्सची रक्कम स्वीस बँकेत जमा करण्यात आली होती. स्वीस बँकेच्या अधिकाऱ्यानी भारत सरकारला दिलेल्या माहितीनुसार डॉलर्स बरोबर भारताच्या नागरीकांचे १५०० अब्ज डॉलर्स जमा आहेत. जगात अशा प्रकारचे ७७ देश 'टॅक्स हेवन' म्हणून ओळखले जातात या टॅक्स हेवनमध्ये भारताच्या नागरीकाचे सुमारे २० लाख कोटी रुपये जमा असण्याचा अंदाज आहे. हा सर्व पैसा देशाच्या गरीब जनतेला लुटून गोळा केला आहे.

भारतीयांचा सर्वात जास्त काळा पैसा स्वित्झर्लंड, मॉरिशस, लिचेनस्टेन, ब्रिटीश व्हर्जिन या देशात आहे. तर टू जी स्पेक्ट्रम, कॉमनवेल्थ गेम्स आणि मधू कोडा घोटाळयातील काळा पैसा दुबई, सिंगापूर, मॉरिशस मार्गे स्वित्झर्लंड आणि अन्य टॅक्स हेवन असलेल्या देशामध्ये पाठवला गेल्याचा दावा सी.बी.आय. संचालक ए. पी. सिंग यांनी केला आहे.

## ➢ काळा पैसा शोधून काढण्यासाठी अभ्सास गटः-

परदेशी बँकांतील काळे धन शोधून काढण्यासाठी सरकारतर्फे कोणतेही कृतीदल स्थापन केले गेले नाही. परंतू हे काळे धन किती असू शकेल याचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर तीन संस्थांची नियुक्ती केली. केंद्रिय अर्थमंत्री पलानी माणिकम् यांच्या मते इ

१) नॅशनल इंस्टिट्युट ऑफ पब्लिक फायनान्स ॲन्ड पॉलिसी.
२) नॅशनल इंस्टिट्युट ऑफ फायनान्सीयल मॅनेजमेंट आणि
३) नॅशनल कोन्सिल फॉर अल्फाईड इकॉनॉमिक रिसर्च.

या तीन संस्थांची नियुक्ती करण्यात आली देशातील बेहिशोबी पैसा व संपत्ती शोधून काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल  असे वारंवार सांगण्यात येते कर चुकविणाऱ्यां करीता कडक शिक्षेच्या तरतुदी आहेत. अनाधिकृत रितीने मिळवलेला पैसा बेहिशोबी संपत्ती उघडकीस आणण्यासाठी प्रप्तीकर विभागातर्फे धाडी घालन्यात येतात. म्हणूनच बेहिशोबी पैसा आपल्या कार्यालयात किंवा घरात न ठेवता अन्य मार्गाचा अवलंब केला जाने शक्य आहे. काळ्या पैशाच्या व्यवहारांना आळा बसावा यासाठी (सी.बी.डी.टी. ने) म्हणजे सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस यांनी पाच लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक किंमतीचे सोने किंवा दागीण्याची खरेदी करणाऱ्या ग्राहकांना पॅन नंबर देणे बंधनकारक केले. २००९ साली बी.जे.पी. टॅक्स फोर्स ने देशातील ब्लॅक मनीचा अंदाज ५०० ते १४०० अब्ज डॉलर दरम्यान केला होता. ग्लोबल फायनान्सियलचा याबदल्यात अंदाज ४६२ अब्ज डॉलर आहे. काळ्या पैशा बाबतची वास्तविक आकडेवारी निश्चीत करण्यासाठी वित्तमंत्र्यांनी मल्टीडिसीप्लीअन्सी कमिटी स्थापन केली. वित्त मंत्री प्रणव मुखर्जी यांनी देशातील ब्लॅक मनीच्या समस्येशी तोंड देण्यासाठी २५ जानेवारी २०११ रोजी पंच सुत्री धोरण जाहीर केले.

१) काळ्या धनाविरोधी वैश्विक मोहिमेत सामिल होणे.
२) काळ्या धनाबाबत कायदेशीर फ्रेम वर्क तयार करणे.
३) अवैद्य धनाची समस्या सोडविण्यासाठी विविध संस्थांची स्थापना करणे.
४) काळे धन आणि त्यातील संबंधीत लोकांवर कारवाई करण्यासाठी विशीष्ट पध्दती विकसीत करणे.
५) या समस्येचा निपटारा करण्यासाठी कार्यक्षम आणि प्रशिक्षीत मणुष्यबळ विकसीत करणे.

## ➢ काळया पैशाचे व्यवहार राखण्यासाठी केंद्र सरकारचे प्रयत्नः-

१) गेल्या १६ वर्षातील प्राप्तीकर विवरन पत्रांची फेर तपासणी-करण्यात येणार आहे.
२) स्थावर मालत्तेचे हस्तांतरण आणि सोने खरेदी करतांना उद्‌गम कर (टीडीएस्) भरला आहे की नाही तसेच परदेशातील मालमत्तेची माहिती देणे आणिवार्य केले जाणार आहे.
३) देशभरात उघडकीस येणारे खान गैरव्यवहार लक्षात घेता केंद्राने कोळशाचा व्यापार आणि खानकामातून मिळणाऱ्या उत्पन्नाची माहिती देणे आनिवार्य केली आहे.
४) मालमत्तेचा स्थर विचार न घेता बेहिशोबी मालमत्ता, गूंतवणुक यावर थेट ३० टक्के कर लावण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.
५) विदेशात कोणत्याही स्थावर मालमत्तेवर किंवा पैशाशी निगडीत व्यक्तीला त्याबाबत खुलासा करणे अणिवार्य असणार आहे.
६) विदेशातून कोणत्याही मालमत्तेतुन मिळणारे उत्पन्न आता करपात्र ठरणार आहे.

७) कर भरण्यास टाळाटाळा करणाऱ्यांना लगाम घालन्यासाठी कडक कायदा करण्यात येणार आहे. त्यासाठी जनरल ॲन्टी अव्हाइडन्स रुल (जीएएआर) लागू करण्यात येणार आहे.

## ➢ निष्कर्ष:-

काळा पैसा हा भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील फार मोठे आव्हाण आहे. एकीकडे भारतीय अर्थव्यवस्थेवर विदेशी कर्जाचा बोजा फार मोठा वाढत आहे. तर दुसरीकडे फार मोठ्या प्रमाणात देशातील पैसा विदेशी बँकांमध्ये काळ्या पैशाच्या स्वरुपात देशाबाहेर जात आहे. तसेच काळ्या पैशामुळे देशात गरीब आणि श्रीमंत यांच्यामधिल दरी दिवसेंदीवस वाढतच चाललेली आहे. भारत सरकारणे या काळ्या पैशाला आळा घालण्यासाठी काही प्रमाणात प्रयत्न सुरे केलेले असले तरी याबाबतचे धोरणे अधिक प्रभावीपने राबवण्याची गरज आहे.

## ➢ संदर्भ सूची:-

१) भारतीय अर्थव्यवस्था - रुद्रदत्त. के. पी. एस. सुंदरम्.
२) भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल - प्रा. शरद शंकर जोशी.
३) भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. एम. एम. साबळे.
४) दैनिक लोकमत - ए. पी. सिंग - टॅक्स हेवन देशावर हल्लाबोल - १४ फेब्रुवारी २०१२.
५) दैनिक सकाळ - अनिल लांब - काळा पैसा- ०२ जानेवारी २०११.
६) दैनिक लोकसत्ता - डॉ. रामदास गुजराती - स्विस बँक आणि काळा पैसा - सप्टेंबर २००९.
७) www.majha posiview.Com.